# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## दूरशिक्षण केंद्र
## परिपत्रक

**विषय :** मार्च/एप्रिल 2020 च्या परीक्षेचे परीक्षा अर्ज भरून घेणेबाबत...

**संदर्भ :** परीक्षा विभागाचे पत्र संदर्भ क्र.शिवाजी वि/बी.ए./परीक्षा/385 दि.08/06/2020.

परीक्षा विभागाच्या उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार दूरशिक्षण केंद्राअंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, कोव्हीड–19 च्या प्रादुर्भावामुळे व तद्अनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमळे **जे विद्यार्थी मार्च/एप्रिल, 2020 या उन्हाळी सत्रातील परीक्षा अर्ज भरू शकलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांनी त्यांचे परीक्षा अर्ज** दि.08 जून 2020 ते 15 जून 2020 पर्यंत ऑनलाईन भरावेत. व परीक्षा विभागाच्या पत्रामध्ये नमूद केलेल्या विहीत शुल्कासह विहीत मुदतीत आपल्या अभ्यासकेंद्रावर जमा करावेत.

तसेच ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी आपले परीक्षा अर्ज भरलेले आहेत. अशा विद्यार्थ्यांनी पुन्हा परीक्षा अर्ज भरू नयेत.

Sd/-
संचालक

दूरशिक्षण केंद्र/जा.क्रं./35
दि.10.06.2020.

प्रति,
केंद्रप्रमुख/केंद्रसंयोजक
दूरशिक्षण सर्व अभ्यासकेंद्रे

- परीक्षा विभागाकडून परीक्षेसंबधी वेळोवेळी प्राप्त होणा–या सूचनांनुसार दूरशिक्षण केंद्रातंर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या परीक्षेसंबधीची कार्यवाही प्रचलित नियमानुसार नियमित विद्यार्थ्यांसोबत करणेत येईल.

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-416004 महाराष्ट्र
Estd. 1962
NAAC 'A' Grade
PHONE: EPABX – 0091-0231-2609000 DBEE Office: 0231-2609068
B.A. Exam. Section: 0231-2609116 Website: www.unishivaji.ac.in
E-mail: ba.section@unishivaji.ac.in

संदर्भ क्र: शिवाजी वि/बी.ए./परीक्षा/३८६ दिनांक. ०८-०६-२०२०

प्रति,

अधिविभागप्रमुख/प्राचार्य
शिवाजी विद्यापीठ संलग्नीत सर्व
अधिविभाग व महाविद्यालये/परिसंस्था,

विषय :- मार्च/एप्रिल, २०२० मध्ये होणा-या परीक्षांचे अर्ज अप्रुव्ह करण्याची मुदतवाढ मिळणेबाबत.
संदर्भ :- १. शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/११०, ०३-०२-२०२०.
२. शिवाजी वि/बी.ए./परीक्षा/३८, दिनांक ०४-०३-२०२०

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार मार्च/एप्रिल, २०२० मध्ये होणा-या परीक्षेचे संदर्भ क्रमांक १ नुसार परीक्षा अर्ज भरुन घेण्याबाबतच्या तारखा कळविण्यात आल्या होत्या. तसेच संदर्भ क्रमांक २ नुसार परीक्षा अर्ज भरण्याबाबत मुदतवाढ देण्यात आली होती.

तथापी कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे व तदअनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे जे विद्यार्थी परीक्षा अर्ज भरु शकले नाहीत अशा विद्यार्थ्यांना खालील प्रमाणे विलंब शुल्क आकारुन मार्च/एप्रिल २०२० च्या परीक्षेचे परीक्षा अर्ज भरुन घेण्याबाबत मुदतवाढ देण्यात येत आहे.

अभियांत्रिकी, औषध निर्माण, आर्किटेक्चर, टेस्टाईल, बी.टेक. विधी व एमबीए इत्यादी परीक्षेकरिता परीक्षा शुल्क + विलंब शुल्क रु ५०/- + अतिविलंब शुल्क रु ३००/- आकारुन दिनांक ८ ते १५ जून, २०२० या कालावधीमध्ये परीक्षा अर्ज भरुण घेण्यात यावेत.

तसेच उपरोक्त परीक्षा वगळूण अन्य परीक्षसाठी परीक्षा शुल्क + विलंब शुल्क + अतिविलंब शुल्क + (दिनांक ४ ते २२ मार्च २०२० या १९ दिवसांचे कालावधीचे प्रतिदिनी रु ५०/- प्रमाणे विशेष विलंब शुल्क) आकारुन दिनांक ८ ते १५ जून, २०२० या कालावधीमध्ये परीक्षा अर्ज भरुण घेण्यात यावेत.

ज्या विद्यार्थ्यांचे निकाल लॉकडाउन कालावधीमध्ये जाहिर झाले असतील अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज नियमित शुल्क आकारुन (फक्त परीक्षा शुल्क आकारुन) भरुन घेण्यात यावेत.

उपरोक्त नुसार दिनांक ८ ते १५ जून, २०२० या कालावधीमध्ये परीक्षा अर्ज स्विकारावेत व ते त्या त्या दिवशी महाविद्यालयामध्ये अप्रुव्ह करावेत. तसेच त्यांचे शुल्क ही विद्यापीठाच्या बॅंक खात्यामध्ये भरावेत व बॅंक चलन व सदर अर्जाच्या अप्रुव्ह यादयांच्या सॉप्टकॉपी संबंधीत परीक्षा विभागास मेल करावी तद्नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

प्र- संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ